
## ८. विकास प्रशासन

**प्र.१ दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**
**१. नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक हिताचा पुरस्कार करण्यासाठी पुढाकार घेणारे राज्य –**
**उत्तर :** कल्याणकारी राज्य
**२.प्रशासकीय कामकाजातील दिरंगाई –**
**उत्तर :** लालफीत

**प्र. २ पुढील संकल्पनचित्र पूर्ण करा :**




**प्र.२ पुढील विधाने चूक किंवा बरोबर ते सकारण स्पष्ट करा :**
**(१) बदल आणि विस्तार यांवर आधारित दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात.**
**उत्तर :** हे विधान चूक आहे.
**कारण :** बदल आणि विकास यांवर आधारित दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात.

**(२) स्वातंत्र्योत्तर भारतात शासनाने हेतुःपुरस्सर सार्वजनिक क्षेत्रामध्ये गुंतवणूक केली.**
**उत्तर :** हे विधान बरोबर आहे.
**कारण :** भारत सरकारला आर्थिक विकासाची संरचना निर्माण करावयाची होती.

**(३) ७३ व्या घटनादुरुस्तीने नगरपालिकांना घटनात्मक दर्जा दिला.**
**उत्तर :** हे विधान चूक आहे.
**कारण :** ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण भागातील पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा दिला.

**प्र. ४ सहसंबंध स्पष्ट करा :**
**(१) पारंपरिक लोकप्रशासन आणि विकास प्रशासन.**
**उत्तर :** (१) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील पारंपरिक लोकप्रशासन पदसोपान, नियंत्रणकक्षा, आज्ञौभ्या' संघटकविषयक सिद्धांताप्रमाणे कार्य करीत असे. त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि नियोजित बदल करण्यासाठी विकास प्रशासनाचा पुरस्कार करण्यात आला.
(२) पारंपरिक प्रशासनात कायदे, प्रशासकीय नियम, प्रशासकीय कार्यपद्धती यांना प्राधान्य दिले जाते.

त्यातून 'जैसे थे' ही अवस्था उद्भवते. याउलट विकास प्रशासन हे बदलाभिमुख आहे. त्यात विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या मार्गात येणारे अडथळे दूर करण्यास प्राधान्य दिले जाते.

**प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(१) पारंपरिक लोकप्रशासनात समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही चार क्षेत्रांची चर्चा करा.**
**उत्तर : पारंपरिक लोकप्रशासनात पुढील क्षेत्रांचा समावेश असतो :**
**(१) प्रशासकीय यंत्रणेचे संघटन :** प्रशासनाशी निगडित विविध संस्था उदा., मंत्रालय, त्यातील विविध खाती व विभाग आणि त्यांचे क्षेत्रीय संघटन, लोकसेवा आयोग व नीती आयोग यांसारख्या स्वायत्त संस्था, त्यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश प्रशासकीय यंत्रणेच्या संघटनात करण्यात येतो.
**(२) विविध कार्यांचे व्यवस्थापन :** POSDCORB या संक्षेपात विहित केलेल्या नियोजन, संघटन, कर्मचारी वर्ग, मार्गदर्शन, समन्वय,अहवाल आणि अंदाजपत्रक या कार्यांच्या व्यवस्थापनाचा समावेश असतो.
**(३) कर्मचारी व्यवस्थापन :** प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करणारा मानवी घटक म्हणजे प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी. त्यांची भरती, प्रशिक्षण, सेवाशर्ती, भरती करणारी यंत्रणा व तिची कार्यपद्धती यांचा समावेश असतो..
**(४) वित्त प्रशासन :** वित्त प्रशासनाचे जीवनदायी काम आहे. प्रशासकीय खर्चासाठी लागणारा निधी व त्याचा विनियोग,अंदाजपत्रकीय प्रक्रिया, संसदेच्या वित्तीय समित्या, हिशेब व लेखा परीक्षण इत्यादींचा त्यात समावेश असतो.
**(५) प्रशासकीय कायदे :** संसद कायदयांची रूपरेषा निर्धारित करते. तपशीलवार नियम तयार करण्याची जबाबदारी नोकरशाहीवर सोपवली जाते. सनदी नोकरशाहांनी तयार केलेल्या नियमांना प्रशासकीय कायदे म्हणतात. त्यांची अंमलबजावणी प्रशासकीय न्यायालये करतात.

**(२) नीती आयोगाची थोडक्यात माहिती लिहा.**
**उत्तर :** (१) १ जानेवारी २०१५ रोजी भारत सरकारने National Institution for Transforming India (NITI) संस्थेची स्थापना केली.
(२) पंतप्रधान या आयोगाचे पदसिद्ध कार्याध्यक्ष असतात. उपाध्यक्ष व अन्य सदस्यांची पाच वर्षांच्या कालखंडासाठी नेमणूक करण्यात येते.
(३) नीती आयोग भारत सरकारला आर्थिक विकास व तत्सम बाबींसंबंधी सल्ला देणारा विचार गट (Think Tank) आहे.
(४) पूर्वीच्या नियोजन आयोगाला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार होता. मात्र नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नीती आयोगास धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत.
(५) १९९० च्या दशकात भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले.या नवीन व्यवस्थेत नियोजन विषयक दृष्टीकोन बदलण्याची आवश्यकता लक्षात घेऊन, भारत सरकारने नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना केली.

**(३) भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध उपक्रमांचा आढावा घ्या.**
**उत्तर :** स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारत सरकारने ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासाद्वारा दारिद्र्य निर्मूलन यासाठी विविध उपक्रम हाती घेतले, ते पुढीलप्रमाणे आहेत :
(१) सामूहिक विकास कार्यक्रम : विस्तार आणि राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अनुक्रमे १९५२ व १९५३ मध्ये हाती घेण्यात आले. लोकसहभागाद्वारा ग्रामीण विकास साध्य करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

(२) कृषी विकास : ग्रामीण जनतेच्या उपजीविकेचे एकमेव सधन शेती असल्याने भारत सरकारने कृषी उत्पादन वाढवण्यासाठीचा हरित क्रांती हा कार्यक्रम १९६६ साली हाती घेतला. शेतीसाठी जलसिंचनाचा योग्य वापर व्हावा यासाठी १९७५ साली जलप्रदाय क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला.
(३) २० कलमी कार्यक्रम : दारिद्य निर्मूलन आणि लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी १९७५ साली भारत सरकारने २० कलमी कार्यक्रम सुरू केला.
(४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ग्रामीण दारिद्य कमी करण्याचा हा सर्वांगीण कार्यक्रम १९८० मध्ये सुरू करण्यात आला.
(५) बेरोजगारी निर्मूलन : दारिद्याचे मूळ कारण उत्पन्नाचा अभाव आणि उत्पन्नाच्या अभावाचे कारण बेरोजगारी असते. म्हणून १९८९ साली ग्रामीण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जवाहर रोजगार कार्यक्रम हाती घेण्यात आला. २००५ साली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) के कार्यक्रम द्वारा रोजगार हक्काची हमी देण्यात आली.
(६) आर्थिक समावेशन : दारिद्र्यरेषेखालच्या सर्व कुटुंबांना आर्थिक सेवा पुरवणे आणि त्यांचे आर्थिक समावेशन करण्याच्या उद्दिष्टाने सन २०१४ मध्ये प्रधानमंत्री जन-धन योजना हाती घेण्यात आली.

**प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(१) पारंपरिक लोकप्रशासनात समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही चार क्षेत्रांची चर्चा करा.**
**उत्तर : पारंपरिक लोकप्रशासनात पुढील क्षेत्रांचा समावेश असतो :**
**(१) प्रशासकीय यंत्रणेचे संघटन :** प्रशासनाशी निगडित विविध संस्था उदा., मंत्रालय, त्यातील विविध खाती व विभाग आणि त्यांचे क्षेत्रीय संघटन, लोकसेवा आयोग व नीती आयोग यांसारख्या स्वायत्त संस्था, त्यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश प्रशासकीय यंत्रणेच्या संघटनात करण्यात येतो.
**(२) विविध कार्यांचे व्यवस्थापन :** POSDCORB या संक्षेपात विहित केलेल्या नियोजन, संघटन, कर्मचारी वर्ग, मार्गदर्शन, समन्वय,अहवाल आणि अंदाजपत्रक या कार्यांच्या व्यवस्थापनाचा समावेश असतो.
**(३) कर्मचारी व्यवस्थापन :** प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करणारा मानवी घटक म्हणजे प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी. त्यांची भरती, प्रशिक्षण, सेवाशर्ती, भरती करणारी यंत्रणा व तिची कार्यपद्धती यांचा समावेश असतो..
**(४) वित्त प्रशासन :** वित्त प्रशासनाचे जीवनदायी काम आहे. प्रशासकीय खर्चासाठी लागणारा निधी व त्याचा विनियोग,अंदाजपत्रकीय प्रक्रिया, संसदेच्या वित्तीय समित्या, हिशेब व लेखा परीक्षण इत्यादींचा त्यात समावेश असतो.
**(५) प्रशासकीय कायदे :** संसद कायदयांची रूपरेषा निर्धारित करते. तपशीलवार नियम तयार करण्याची जबाबदारी नोकरशाहीवर सोपवली जाते. सनदी नोकरशाहांनी तयार केलेल्या नियमांना प्रशासकीय कायदे म्हणतात. त्यांची अंमलबजावणी प्रशासकीय न्यायालये करतात.

**(२) नीती आयोगाची थोडक्यात माहिती लिहा.**
**उत्तर :** (१) १ जानेवारी २०१५ रोजी भारत सरकारने National Institution for Transforming India (NITI) संस्थेची स्थापना केली.
(२) पंतप्रधान या आयोगाचे पदसिद्ध कार्याध्यक्ष असतात. उपाध्यक्ष व अन्य सदस्यांची पाच वर्षांच्या कालखंडासाठी नेमणूक करण्यात येते.
(३) नीती आयोग भारत सरकारला आर्थिक विकास व तत्सम बाबींसंबंधी सल्ला देणारा विचार गट (Think Tank) आहे.
(४) पूर्वीच्या नियोजन आयोगाला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार होता. मात्र नव्याने स्थापन करण्यात

आलेल्या नीती आयोगास धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत.
(५) १९९० च्या दशकात भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले.या नवीन व्यवस्थेत नियोजन विषयक दृष्टीकोन बदलण्याची आवश्यकता लक्षात घेऊन, भारत सरकारने नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना केली.

**(३) भारतातील दारिद्य निर्मूलनाच्या विविध उपक्रमांचा आढावा घ्या.**
**उत्तर :** स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारत सरकारने ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासाद्वारा दारिद्य निर्मूलन यासाठी विविध उपक्रम हाती घेतले, ते पुढीलप्रमाणे आहेत :
(१) सामूहिक विकास कार्यक्रम : विस्तार आणि राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अनुक्रमे १९५२ व १९५३ मध्ये हाती घेण्यात आले. लोकसहभागाद्वारा ग्रामीण विकास साध्य करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला.
(२) कृषी विकास : ग्रामीण जनतेच्या उपजीविकेचे एकमेव सधन शेती असल्याने भारत सरकारने कृषी उत्पादन वाढवण्यासाठीचा हरित क्रांती हा कार्यक्रम १९६६ साली हाती घेतला. शेतीसाठी जलसिंचनाचा योग्य वापर व्हावा यासाठी १९७५ साली जलप्रदाय क्षेत्र विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला.
(३) २० कलमी कार्यक्रम : दारिद्य निर्मूलन आणि लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी १९७५ साली भारत सरकारने २० कलमी कार्यक्रम सुरू केला.
(४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ग्रामीण दारिद्य कमी करण्याचा हा सर्वांगीण कार्यक्रम १९८० मध्ये सुरू करण्यात आला.
**(५) बेरोजगारी निर्मूलन :** दारिद्याचे मूळ कारण उत्पन्नाचा अभाव आणि उत्पन्नाच्या अभावाचे कारण बेरोजगारी असते. म्हणून १९८९ साली ग्रामीण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जवाहर रोजगार कार्यक्रम हाती घेण्यात आला. २००५ साली महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) के कार्यक्रम द्वारा रोजगार हक्काची हमी देण्यात आली.
**(६) आर्थिक समावेशन :** दारिद्यरेषेखालच्या सर्व कुटुंबांना आर्थिक सेवा पुरवणे आणि त्यांचे आर्थिक समावेशन करण्याच्या उद्दिष्टाने सन २०१४ मध्ये प्रधानमंत्री जन-धन योजना हाती घेण्यात आली.

**प्र. ६ आपले मत नोंदवा :**
**१) विकास प्रशासनात लोकसहभाग आवश्यक आहे.**
**उत्तर :** सन १९५२ मध्ये भारत सरकारने सामूहिक विकास कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण घटक लोकसहभाग हा होता. या कार्यक्रमाचे मूल्यमापन १९५७ साली करण्यात आले.मूल्यमापन समितीने हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी झाल्याचे नमूद केले. तिच्या मते या कार्यक्रमाच्या अपयशाचे प्रमुख कारण लोकसहभागाचा अभाव हे होते. तात्पर्य म्हणजे कोणत्याही शासकीय कार्यक्रमाची यशस्वी कार्यवाही होण्यामागे लोकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे.